# प्रताप महाविद्यालयात लेखन-काव्य-संगीत कार्यशाळा उत्साहात



अमळनेर–महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय मार्फत ज्येष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे, गीतकार ग.दि.माडगूळकर आणि संगीतकार सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दिनांक १५ डिसेंबर रोजी प्रताप महाविद्यालयात लेखन–काव्य–संगीत कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेचे उद्घाटन खान्देश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात **(पान २ वर)**



**प्रताप महाविद्यालयात लेखन-** **(पान १ वरुन)**

आले. कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.ज्योती राणे होत्या. प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक प्रा.डॉ.रमेश माने यांनी केले. नीरज अग्रवाल यांनी उद्घाटनपर भाषण केले तर अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ.राणे यांनी केले. या कार्यशाळेसाठी प्रा.डॉ.प्रकाश सपकाळे(भुसावळ), प्रा.प्रभाकर पुराणिक (धुळे) व मोरेश्वर सोनार (जळगाव) साहित्य लेखनावर तर हंसराज देसाई (झोड़गे–मालेगाव) व संतोष कांबळे (मालेगाव) यांनी काव्य लेखनावर तसेच ज्येष्ठ संगीतकार धनंजय धुमाळ व गौरव तेजाळे(नाशिक) यांनी संगीत या कार्यशाळेसाठी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत साहित्य व काव्यलेखनाची निर्मिती प्रक्रिया, लेखनाचे तंत्र, आशय, विषय, सादरीकरण या संदर्भात मौलिक मार्गदर्शन केले. संगीत या कार्यशाळेत गायनाच्या विविध पद्धती, विविध रागांचा परिचय, शास्त्रीय व सुगम संगीताची प्राथमिक ओळख व विविध चालींची निर्मिती आदी विषयांवर संगीतकार–गायक धनंजय धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी लेखन काव्य संगीत अशा प्रत्येकी कार्यशाळेत शंभर प्रशिक्षणार्थींची प्रवेश मर्यादा होती. यात तीनशेहून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणार्थींना शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रमाणपत्र व महाविद्यालयाच्या वतीने भोजनाची व्यवस्था केली होती. कार्यशाळेसाठी संस्थेचे अध्यक्ष अनिल कदम, उपाध्यक्ष कमल कोचर, सौ.माधुरी पाटील, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, विश्वस्त वसुंधरा लांडगे, चिटणीस प्रा.डॉ.ए.बी.जैन, संचालक मंडळातील सदस्य योगेश मुंदडे, प्रदीप अग्रवाल, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र माळी, उपप्राचार्य डॉ.पी.बी.भराटे, एस.ओ.माळी, डॉ.एल.एल.मोमाया, डॉ.शैलजा माहेश्वरी, डॉ.शिरोडे, एम.एस.वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य भावसार तसेच प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या तीनही कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.ज्ञानोबा कांबळे, प्रा.डॉ.धनंजय चौधरी प्रा.किर्ती पाटील यांनी केले तर आभार प्रा.डॉ.कल्पना पाटील यांनी मानले.




लेखन । काव्य । संगीत
कार्यशाळा
संगीत कार्यशाळा


सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगाव
कार्यशाळा
संगीत कार्यशाळा






सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगाव
शनिवार, दि.
ते सायं.५
स्थळ :
जळगाव


म हा त्र यीं ची
ज न्म श ता ब्दी
लेखन कार्यशाळा
PRATAP COLLEGE


सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगाव
लेखन । काव्य । संगीत
कार्यशाळा
संगीत कार्यशाळा